**प्रेस नोट दिनांक ०६/०२/२०२४**

## एकाच वेळी ०४ ठिकाणी घरफोडी करणारा आरोपी २४ तासात जेरबंद, शहर गुन्हे शाखेची कामगिरी.

---

दिनांक ०२/०२/२०२४ रोजी पहाटेच्या वेळी, सोलापूर शहरामध्ये, जुना एम्प्लॉयमेंट चौकाजवळील रोहन अपार्टमेंट मध्ये काही दुकानांचे शटरचे लॉक तोडून तसेच नमूद अपार्टमेंट समोरील एका घराचे कुलुप तोडून घरफोडी चोरीचे प्रकार घडले होते. त्याबाबत, सदर बझार पोलीस स्टेशन, सोलापूर शहर येथे घरफोडी चोरीचे ०४ गुन्हे दाखल आहेत.

सदर घरफोडी चोरीची माहिती मिळताच, गुन्हे शाखेकडील सहायक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तसेच सहायक पोलीस निरीक्षक आणि त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार यांनी तात्काळ घटनास्थळी भेट दिली होती. घटनास्थळी भेट दिल्यानंतर, घटनास्थळाचा बारकाईने अभ्यास करून, तसेच घटनास्थळावरील तांत्रिक बाबींचे विश्लेषण हे गुन्हे शाखेकडून करणेत आले.

त्यानंतर, तांत्रिक विश्लेषणाचे आधारे, तसेच गोपनिय माहितीच्या आधारे, गुन्हे शाखेचे पोउपनि अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार पोना/१३७९ बापू साठे, पोशि/१७२९ सुभाष मुंढे, पोशि/१०७५ भारत पाटील, पोशि/१७१२ सैपन सय्यद यांनी, दि. ०३/०२/२०२४ रोजी ००:५० वा. भैय्या चौक, सोलापूर जवळील रेल्वे ब्रिज येथे, इसम नामे- कुमार विजयन, वय ५५ वर्षे, रा. मूळ गाव - थुडीयलुर, जि.कोईमतूर, राज्य तामीळनाडू, सध्या रा. के.आर. फुल मार्केटच्या फुटपाथवर, के.आर. फुलमार्केट, बेंगलुरु, राज्य कर्नाटक यास ताब्यात घेतले.

पोउपनि/अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार यांनी, वर नमूद इसमाकडे कौशल्यपूर्वक कन्नड भाषेत तपास केला असता, त्याने रोहन अपार्टमेंट येथे शटरची दुकाने तोडून चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर, त्याचे ताब्यातील बॅगेची झडती घेतली असता, एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन, चार्जर, रोख रक्कम, एक लहान व एक मोठा स्टीलचा रॉड (टॉमी), एक स्क्रु-ड्रायव्हर, दोन तुटलेल्या स्थितीतील कुलुप मिळून आले.

इसम नामे- कुमार विजयन याचेकडून खालील प्रमाणे सदर बझार पोलीस स्टेशन येथील ०४ घरफोडी चोरीचे गुन्ह्यामधील १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करून, सदरचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | मिळाला माल |
|---|---|---|---|
| १ | सदर बझार | गु.र.नं. ६९/२०२४ भा.दं.वि. कलम ४५७, ३८० | ७०००/- रु. रोख रक्कम |
| २ | सदर बझार | गु.र.नं. ७१/२०२४ भा.दं.वि. कलम ४५४, ४५७, ३८० | एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल व चार्जर किं.अं. ६२००/- रु. |
| ३ | सदर बझार | गु.र.नं. ७२/२०२४ भा.दं.वि. कलम ४५४, ४५७, ३८०, ५११ | १२००/- रुपये रोख रक्कम |
| ४ | सदर बझार | गु.र.नं. ७३/२०२४ भा.दं.वि. कलम ४५७, ३८०, ५११ | प्रयत्न |

सदरची कामगिरी, मा.श्री.एम. राजकुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्रीमती प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे, मार्गदर्शनाखाली, पोलीस उपनिरीक्षक अल्फाज शेख, पोलीस अंमलदार बापू साठे, भारत पाटील, सुभाष मुंढे, सैपन सय्यद, सतिश काटे, अविनाश पाटील यांनी केली आहे.

पोलीस आयुक्त, सोलापूर शहर
करिता

Scanned with CamScanner